आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १७ ऑगस्ट २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. निवडणूक आयोग सर्व पक्षांना समान वागणूक देतो: मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच प्रतिपादन; वोटचोरीच्या आरोपांच केले खंडन.

2. नागपूरचे श्रीमंत राजे रघूजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवारीचे सोमवारी मुंबईत होणार स्वागत.

3. जनसंवादद्वारे महसूल मंत्री पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाणून घेतल्या जनतेच्या समस्या स्वीकारली विविध विषयांवरील २८० निवेदने.

4. राज्यात सर्वदूर पाऊस, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांना आज हवामान विभागाचा रेड अलर्ट.

<u>निवडणूक आयोग पत्रपरिषद</u>

केंद्रीय निवडणूक आयोगाने आज स्पष्ट केले की सर्व पक्ष त्यांच्यासमोर समान आहेत आणि आयोग कुठल्याही राजकीय पक्षांमध्ये भेदभाव करत नाही. आज दुपारी नवी दिल्लीत माध्यमांना माहिती देताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की निवडणूक आयोग त्यांच्या संवैधानिक कर्तव्यापासून कधीही मागे हटणार नाही. काही लोक दुहेरी मतदानाचा आरोप करतात, परंतु जेव्हा पुरावे मागितले जातात तेव्हा त्यांना कोणतेही उत्तर दिले जात नाही. निवडणूक आयोग किंवा कोणताही मतदार अशा खोट्या आरोपांना घाबरत नाही असे सांगून मुख्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले की निवडणूक आयोग निर्भयपणे गरीब, श्रीमंत, वृद्ध, महिला आणि तरुणांसह सर्व वर्ग आणि सर्व धर्मांच्या मतदारांसोबत कोणताही भेदभाव न करता उभा राहील....

<u>*जब चुनाव आयोग के कंधे पर बंदूक रखकर भारत के मतदाताओं को निशाना बनाकर राजनीति की जा रही हो, तो आज चुनाव आयोग सबको स्पष्ट करना चाहता है, कि चुनाव आयोग निडरता के साथ सभी गरीब, अमीर, बुजुर्ग, महिला, युवा सहित सभी वर्गों और सभी धर्मों के मतदाताओं के साथ बिना किसी भेदभाव के चट्टान की तरह खड़ा था, खड़ा है, और खड़ा रहेगा।*</u>

मागील लोकसभा निवडणुकीदरम्यान एक कोटींहून अधिक सरकारी कर्मचारी, १० लाखांहून अधिक बूथ-लेव्हल एजंट आणि उमेदवारांचे २० लाखांहून अधिक मतदान एजंट

या प्रक्रियेचा भाग होते. इतक्या लोकांसमोर इतक्या पारदर्शक प्रक्रियेत मते कशी चोरी केली जाऊ शकतात असा प्रतिसवाल देखील त्यांनी या पत्रपरिषदेत उपस्थित केला. कुमार यांनी बिहारमधील ७ कोटींहून अधिक मतदार निवडणूक आयोगाच्या बाजूने उभे असताना त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करता येणार नाही, असेही सांगितले.

<u>प्रकाश आंबेडकर</u>

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उद्या १८ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.ही याचिका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी दाखल केली असून, यात विशेषतः निवडणूक आयोगाने सायंकाळी ६ नंतर टाकलेल्या तब्बल ७६ लाख मतांचा डेटा जतन करून न ठेवण्याबाबत गंभीर आक्षेप नोंदवला आहे.वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष **ॲ**ड. प्रकाश आंबेडकर यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करत या संदर्भातील माहिती दिली आहे. याआधी मुंबई उच्च न्यायालयात संध्याकाळी 5 नंतर झालेल्या 76 लाख मतदाना संदर्भातील न्यायालयीन लढाई **ॲ**ड. प्रकाश आंबेडकर हे लढत होते, मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळयानंतर **ॲ**ड. प्रकाश आंबेडकर हे सर्वोच्च न्यायालयात न्यायालयीन लढाई लढत असल्याच हिंदुस्थान समाचार वृत्तसंस्थेने दिलेल्या बातमीत सांगितल आहे.

<u>एक्सप्रेस-वे</u>

गेल्या अकरा वर्षांत पायाभूत सुविधांसाठीचा निधी सहा टक्क्यानी वाढवला असून विविध प्रकल्पांमुळे रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राजधानी दिल्लीत अकरा हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन केलं, त्यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं. या विकास प्रकल्पात द्वारका द्रुतगती मार्गाचा दिल्ली विभाग आणि शहरी विस्तार रस्ता-२ यांचा समावेश आहे. येत्या काळात केंद्र सरकार धोरणात्मक सुधारणा करणार असून वस्तू आणि सेवा करातली सुधारणा याचाच भाग आहे, याचा फायदा देशातल्या नागरिकांना होईल, असं पंतप्रधान म्हणाले.

<u>*अब जीएसटी में नेक्स्ट जनरेशन रिफॉर्म होने जा रहा है। इस दीवाली जीएसटी रिफॉर्म से डबल बोनस देशवासियों को मिलने वाला है। हमने इसका पूरा प्रारूप राज्यों को भेज दिया है। मैं आशा करता हूँ, कि सभी राज्य भारत सरकार के इस इनीशिएटिव को सहयोग करेंगे। जल्द से जल्द इस प्रक्रिया को पूरा करेंगे, ताकि ये दिवाली और ज्यादा शानदार बन सके। हमारा प्रयास जीएसटी को और आसान बनाने और टैक्स दरों को रिवाइज़ करने का है।*</u>

यावेळी पंतप्रधानांनी स्वदेशी उत्पादनांचं महत्त्व अधोरेखित करत व्यापारी, दुकानदारांना स्वदेशी वस्तूंची विक्री करण्याचं तसंच नागरिकांना स्वदेशी वस्तू खरेदी करण्याचं आवाहन केलं. दरम्यान, उद्धटनाआधी पंतप्रधानांनी प्रकल्पाचं बांधकाम करणाऱ्या मजुरांशी संवाद साधला. तसंच शहरी विस्तार रस्ता २ चं अवलोकन केलं. या कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते.

<u>तलवार</u>

नागपूरचे संस्थानिक श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार उद्या 18 ऑगस्ट सोमवार रोजी मुंबईत दाखल होणार असून, महाराष्ट्र शासनातर्फे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जोरदार स्वागत होणार आहे. तर संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण सोहळा पार पडेल. श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र शासनाने लिलावात जिंकली असून नुकतीच सांस्कृतिक कार्य मंत्री **ॲ**ड.आशिष शेलार यांनी लंडन येथे ही तलवार ताब्यात घेतली असून, उद्या 18 ऑगस्टला ती मुंबईत दाखल होईल. विमानतळ प्राधिकरणाकडून सांस्कृतिक कार्य मंत्री **ॲ**ड.आशिष शेलार सकाळी 10 वाजता ही ऐतिहासिक तलवार स्वीकारतील. त्यानंतर विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला अभिवादन करुन बाईक रॅली काढून, चित्ररथावर विराजमान करुन ही तलवार पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीकडे नेण्यात येईल. श्रीमंत सेना साहेब सुभा रघुजीराजे भोसले यांच्या इंग्लंडमधून आलेल्या तलवारीचे व बारा वारसा मानांकित गडकिल्ल्यांच्या माहितीचे प्रदर्शन, १९ ते २५ ऑगस्ट दरम्यान सकाळी ११ ते सायं ७ या वेळेत, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथील कला दालनात सुरू राहणार आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

<u>कोल्हापूर सर्किट बेंच</u>

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच इमारतीचे उद्घाटन आज भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते फित कापून व कोनशिलेचे अनावरण करुन करण्यात आले.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्किट बेंच इमारतीच्या उद्घाटनाचा सोहळा पार पडला.या सर्किट बेंचचा लाभ कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना होणार आहे.

## जनसंवाद

महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरच्या सदर येथील नियोजन भवन येथे आयोजित जनसंवाद कार्यक्रमात वृद्ध, महिला, विद्यार्थी, दिव्यांग, तृतीय पंथी अशा समाजाच्या सर्व थरातील जनतेच्या समस्या जाणून घेतल्या त्यांची निवेदने स्वीकारून त्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी आश्वस्त केले. नागपूरसह वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली व अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी महसूल मंत्री बावनकुळे यांची या कार्यक्रमात भेट घेतली.यावेळी २८० लेखी निवेदने स्वीकारण्यात आली.यावेळी नागरिकांनी व्यक्तिशः भेट घेवून संवाद साधत आपल्या समस्या, अडचणी आणि मागण्या लेखी स्वरुपात सादर केल्या. विविध शिष्टमंडळांनीही यावेळी बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदने सादर केली. जनतेच्या समस्या, मागण्या समजून घेत यावर उचित कार्यवाही करण्यासंदर्भात त्यांनी उपस्थित विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले तसेच शासनाच्या संबंधित विभागाकडे कार्यवाहीसाठी पाठविण्याचे निर्देशही दिले.

## हवामान

विदर्भात पुढील २४ तासासाठी,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, या जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे. तर संपुर्ण विदर्भात पुढील चार दिवस हलक्या ते मध्यम पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. भारतीय हवामान खात्याकडून १७ ते २१ दरम्यान अति अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस होत असून नद्यांची पाणीपातळी वाढली आहे.

*****